**<u>प्रेसनोट दिनांक- १३/०७/२०१९</u>**

**<u>समर्थ पोलीस स्टेशन पुणे</u>**

**अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवुन नेणा-या आरोपीस अटक**

समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर हद्दीमध्ये नाना पेठ, पुणे येथे राहणारे एका इसमाच्या अल्पवयीन मुलीस राहते ठिकाणाजवळील परीसरामध्ये राहणा-या तरुण नामे- संदिप बाळु भवाळ वय २३ वर्षे, याने तिचे बालवयाचा फायदा घेवून, तिस फुस लावून पळवुन नेलेबाबत सदर पिडीत मुलीचे वडिलांनी फिर्याद दिल्याने समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.र.नं.२००/२०१९ भा.द.वि. कलम- ३६३ अन्वये सदर तरुणा विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी संदीप भवाळ याचे नातेवाईकांचा शोध घेऊन तपास करीत असताना सदर आरोपी हा पिडीत मुली सह त्याचे नातेवाईकांचे घरी शिर्डी जि अहमदनगर येथील नातेवाईकाकडे असल्याची माहीती प्राप्त झाल्याने पोलीस उप निरीक्षक संदीप सांळुखे व पोलीस शिपाई राकेश साळुंखे ,पोशि चंद्रकांत खरात याचेसह दिनांक १२/७/२०१९ रोजी संबंधित ठिकाणी जावून खात्री केली असता तेथे पिडीत मुलगी व आरोपी मिळून आले . त्यांना ताब्यात घेऊन समर्थ पोलीस स्टेशन येथे आणून पिडीत मुलीचे पालकांसमक्ष पिडीत मुलीकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास करता आरोपी संदिप बाळु भवाळ वय २३ वर्ष रा सदर याने लग्नाचे आमिष दाखवून नेल्याचे सांगितल्याने सदर आरोपीस दाखल गुन्हयात अटक करुन पिडीत मुलगी हिला त्याचे नातेवाईकाकडे सुखरुप देण्यात आली आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरीक्षक श्री. सांळुखे व पोशि साळुंखे ,पोशि खरात,समर्थ पोस्टे पुणे यांनी केलेली आहे.

-----------------